



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १५३ • पुणे • बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313



सॅमसंगची नवी श्रेणी, २५ फेब्रुवारीला होणार लाँन्च 3

AngelOne

‘एंजल वन सिल्व्हर ईटीएफ’ आणि ‘सिल्व्हर ईटीएफ... 4

# ११ अतिरिक्त जिल्हाधिकारी पदे

## ६९ अतिरिक्त तहसील कार्यालयांना मंत्रिमंडळाची मंजुरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वाढती लोकसंख्या, शहरांचा विस्तार आणि महसूल विभागावरील वाढता कामाचा ताण लक्षात घेऊन राज्य मंत्रिमंडळाने राज्यभरात ११ अतिरिक्त जिल्हाधिकारी पदे आणि ६९ अतिरिक्त तहसील कार्यालये निर्माण करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यामध्ये पुणे विभागात तीन अतिरिक्त जिल्हाधिकारी नेमले जाणार असून इतर महसूल विभागांमध्ये प्रत्येकी एक पद निर्माण होणार आहे.

पुणे जिल्ह्यात बारामती येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन होणार असून चाकण येथे अतिरिक्त तहसीलदार कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनावरील वाढता कामकाजाचा व्याप, नागरिकांची वाढती संख्या, भौगोलिक विस्तार आणि दुर्गम भागातील सेवा पोहोचवण्याची गरज लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.



अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयांच्या स्थापनेसाठी संबंधित तालुक्यांची लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रफळ, आदिवासी व दुर्गम भागांची संख्या, जिल्हा मुख्यालयापासूनचे अंतर आणि नागरिकांना होणारी गैरसोय या बाबींचा सखोल विचार करण्यात आला आहे. तसेच अतिरिक्त तहसील कार्यालयांसाठी महसुली गावे, लोकसंख्या, क्षेत्रफळ, दुर्गम भाग आणि प्रस्तावित कार्यालयामुळे कमी होणारे अंतर यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रस्तावित अतिरिक्त तहसील कार्यालये : मुंबई महानगर प्रदेश, ठाणे, पालघर, पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक, जळगाव, नंदूरबार, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, जालना, परभणी, लातूर, नांदेड, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा, वाशीम, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर आदी जिल्ह्यांतील विविध तालुक्यांमध्ये ६९ अतिरिक्त तहसील कार्यालये स्थापन केली जाणार आहेत. यात कुर्ला-चेंबूर, बोरिवली-मालाड, अंधेरी-वांद्रे, कल्याण-डोंबिवली, खेड-चाकण, फलटण-साखरवाडी, कराड-उंब्रज, निफाड-लासलगाव, सिल्लोड-अजिंठा, जालना-राजूर, लातूर-लातूर, नागपूर-बुटीबोरी, हिंगणा-वानाडोंगरी, अहेरी-जिमलगट्टा आदी ठिकाणांचा समावेश आहे.

### प्रस्तावित अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालये

- **पुणे विभाग : बारामती (पुणे), फलटण (सातारा), पंढरपूर (सोलापूर)**
- **कोकण विभाग : कल्याण (ठाणे), दापोली (रत्नागिरी)**
- **नाशिक विभाग : चाळीसगाव (जळगाव)**
- **छत्रपती संभाजीनगर विभाग : किनवट (नांदेड)**
- **अमरावती विभाग : अचलपूर (अमरावती), पुसद (यवतमाळ), खामगाव (बुलडाणा)**

## ठळक बातम्या

### मुस्लीम समाजाचे ५ टक्के आरक्षण रद्द

**पुणे (आरंभ पर्व) : मुस्लीम समाजाला देण्यात आलेले ५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आले आहे. राज्य सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता मुस्लिम समाजासाठी राबवण्यात येणाऱ्या जात प्रमाणपत्र प्रक्रियेला ब्रेक लावण्यात आला आहे. या निर्णयाचा सुधारित शासन निर्णय राज्य सरकारकडून प्रकाशित करण्यात आला आहे. या शासनादेश आणि परिपत्रकरात आरक्षण रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. या निर्णयामुळे मुस्लिम समाजात मोठा रोष निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. उच्च न्यायालयाने मुस्लिम आरक्षणाला स्थगिती दिल्यानंतर सरकारने हा निर्णय १२ वर्षांनी घेतला आहे.**

### प्रभाग रचनेचे वेळापत्रक जाहीर

**पुणे (आरंभ पर्व) : राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या काळात संपत आहे, तसेच ज्या नवीन ग्रामपंचायती स्थापन झाल्या आहेत, त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग (वॉर्ड) रचनेचा अधिकृत कार्यक्रम राज्य शासनाने जाहीर केला आहे. त्यानुसार येत्या २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेचे काम सुरु होणार असून ग्रामपंचायतींची प्रारुप प्रभाग रचना दि.७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिध्द केली जाणार आहे. ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या प्रारुप प्रभाग रचनेच्या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना वेग येणार आहे. प्रभाग रचनेची प्रक्रिया तीन टप्प्यात पार पडणार असून, त्याची संपूर्ण जबाबदारी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्यावर सोपवण्यात आली आहे. तहसीलदार गुगल अर्थच्या मदतीने २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत गावांचे नकाशे अंतिम करतील. तलाठी आणि ग्रामसेवक २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रत्यक्ष पाहणी करून प्रभाग निश्चित करतील.**




## बुधवार पेठेत ११ बांगलादेशी महिलांसह २२ जण ताब्यात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरातील बुधवार पेठ परिसरात अवैध वास्तव्य आणि देहविक्रय व्यवसायाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी पुन्हा एकदा कठोर कारवाई केली आहे. फरासखाना आणि खडक पोलिस ठाण्यांच्या पथकांनी बुधवारी मध्यरात्री या परिसरात छापेमारी केली. या कारवाईत ११ बांगलादेशी महिलांना ताब्यात घेण्यात आले असून, एकूण २२ महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुप्त माहितीदाराच्या टिपवर आधारित ही छापेमारी राबवण्यात आली. ताब्यात घेण्यात आलेल्या बांगलादेशी महिलांकडे बोगस आधार कार्ड आणि इतर कागदपत्रे आढळून आली आहेत. या महिलांवर अनधिकृतपणे भारतात वास्तव्य करून कुंटणखान्यांमध्ये काम करत असल्याचा आरोप आहे. पोलिस तपासात हे प्रकरण उघडकीस आले असून, अवैध स्थलांतर आणि मानव तस्करीच्या दिशेने तपास सुरू आहे. यापूर्वी ११ फेब्रुवारी रोजी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखा आणि परिमंडळ एकने बुधवार पेठेत 'कोम्बिंग ऑपरेशन' राबवले होते. या ऑपरेशनमध्ये मध्यरात्री १२ ते पहाटे ४ वाजेपर्यंत ४१ इमारती आणि गल्लीबोळांची झाडाझडती घेण्यात आली. ७०० हून अधिक नागरिकांची चौकशी करण्यात आली. या कारवाईत दोन बांगलादेशी महिलांना ताब्यात घेण्यात आले, चार अल्पवयीन मुलींची सुटका करण्यात आली आणि ७ ग्रॅम चरस तसेच नशेची इंजेक्शन्स जप्त करण्यात आली होती. पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या निर्देशानुसार अवैध स्थलांतर, मानव तस्करी आणि अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात अशी कारवाई सुरू ठेवण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. ताब्यात घेण्यात आलेल्या महिलांविरुद्ध फरासखाना पोलिस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. या घटनेने पुणे शहरातील बुधवार पेठ परिसरातील अवैध व्यवहार आणि बांगलादेशी नागरिकांच्या सुळसुळाटाबाबत पुन्हा एकदा चर्चा निर्माण झाली आहे. पोलिसांनी परिसरात कायदा-सुव्यवस्था कायम राखण्यासाठी सतर्कता वाढवली आहे.

## भारती विद्यापीठ परिसरात महिलेवर सामूहिक बलात्कार करून खून; तिघे जेरबंद

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरातील भारती विद्यापीठ परिसरात एका महिलेवर सामूहिक अत्याचार करून तिचा खून करण्यात आल्याची भीषण घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणातील तिन्ही आरोपींना पोलिसांनी जेरबंद केले असून ते सराईत गुन्हेगार असल्याचे प्राथमिक चौकशीतून समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी संबंधित महिलेला जबरदस्तीने रिक्षामध्ये बसवून निर्जन स्थळी नेले. तेथे तिच्यावर




अत्याचार करण्यात आला. त्यानंतर काठीने मारहाण करून एका आरोपीने तिला दगडाच्या खाणीत ढकलून दिल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. गंभीर जखमी झालेल्या महिलेचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले. ओळख पटू नये म्हणून आरोपींनी रिक्षाचे आच्छादन बदलल्याची बाबही उघड झाली आहे. या घटनेचा तपास भारती विद्यापीठ पोलिस स्टेशन तसेच शहर गुन्हे अन्वेषण शाखेने संयुक्तपणे केला. अखेर गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने तिघांना अटक करण्यात यश मिळवले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## सलमान खानचे वडील सलीम खान मुंबईत रुग्णालयात दाखल

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

सलमान खान यांचे वडील आणि ज्येष्ठ पटकथाकार सलीम खान यांना प्रकृती अस्वस्थ झाल्याने मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या तब्येतीबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही

सुपरस्टार सलमान खानचे वडील पटकथा लेखक सलीम खान यांना मंगळवारी मुंबईतील एका रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे वृत्त समोर आले आहे. सलमान, त्याची बहीण अलविरा आणि मेहुणा अतुल अग्निहोत्री रुग्णालयात भेट




घेण्यासाठी पोहोचले. मंगळवारी दुपारी रुग्णालयाबाहेर पापाराझींच्या कॅमेरामध्ये त्यांचे कुटुंबीय स्पॉट झाले.

मीडिया रिपोर्टनुसार, ९० वर्षांचे सलीम खान यांची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हिंदी सिने विश्वातील सर्वात प्रभावशाली लेखकांपैकी एक त्यांना मानले जाते.

सलीम खान यांनी आपल्या करिअरमध्ये अनेक हिट चित्रपट दिले आहेत. सत्तरच्या दशकात सलीम - जावेद यांची जोडी हिट होती. दोघांनी अनेक ब्लॉकबस्टर चित्रपट दिले आहेत. ‘जंजीर’, ‘डॉन’, ‘दीवार’ असे काही त्यांचे खास चित्रपट आहेत.

## दुखवटा काळात झालेला अल्पसंख्यांक दर्जा घोटाळ्यामुळं महाराष्ट्राची बदनामी : खासदार सुप्रिया सुळे

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**


महाराष्ट्राच्या पोलीस आणि प्रशासनाची एक चांगली ओळख देशात होती,दुखवटा काळात झालेला अल्पसंख्यांक दर्जा घोटाळ्यामुळं महाराष्ट्राची बदनामी होत आहे.आता त्याची अशा प्रकरणांमुळं बदनामी होत आहे. हे महाराष्ट्रासाठी चांगलं नाही. मला मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहे की असे प्रकार होणार नाहीत याची काळजी घ्यावी,असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी दिल्ली येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे. सुप्रिया सुळे बोलताना म्हणाल्या की,माणुसकी राहिली आहे की नाही. त्या मंत्रालयात दुखवटा असताना असं झालंच कसं हे खूप गंभीर आहे, शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आला. याबाबत त्यांनी याची माहिती



मला माध्यमातूनच मिळाली. मुख्यमंत्र्यांनी याबाबत स्टे दिला आहे असं मला कळालं आहे. हे प्रकरण माध्यमांनी उजेडात आणलं. त्यामुळं तुमचं अभिनंदन आहे. मी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे याबाबत एक स्टेटमेंट द्यावं अन् हे झालंच कसं हे सांगावं अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की,आमच्या घरातील संस्कार जे झाले आहेत. माझा विश्वास आणि अपेक्षा आहे की आमच्या घरातील मुलं मुलींकडून असं कोणतंही काम करणार नाहीत आणि करू देखील नये.

एवढी एक आत्या, आई आणि मावशी म्हणून आमच्या घरातील सगळ्याच मुलांकडून ही अपेक्षा आहे. असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. सुप्रिया सुळे यांना पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरणी देखील प्रश्न विचारण्यात आला. यावर सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की,पार्थ पवार यांचे प्रकरण न्यायालयात आहे.तपास अहवाल आणि कोर्टाचा अंतिम निर्णय येईपर्यंत त्यावर बोलणं योग्य होणार नाही, न्यायालयाचं यावर काय म्हणणं आहे त्यावर आपण कसं बोलणार.

**सुप्रिया सुळे म्हणाल्या की,कुणीतरी टीप ऑफ दिला ना. हा टिप ऑफ कुणी दिला. स्वतःच्याच मंत्र्याला, मंत्रालयातच कारवाई होते. म्हणजे तुम्हीच तुमच्या मंत्र्यांवर रेड करता, छापा घालता. मुख्यमंत्री ज्या वास्तूत बसतात. त्यात, त्यांच्या डोळ्यासमोर, त्याच मंत्र्यांच कार्यालय तुम्ही सील करता. हा मोठा धक्का आहे. आपल्याच घरात आपण आपल्याच माणसावर छापा घातला असा हा प्रकार आहे. टीप कुणी दिली. हे खरं आहे की खोटं आहे याची उत्तरं माझ्याकडं नाहीत,डेटा आणि वास्तव नसल्यास मी त्यावर अधिक भाष्य करणे, बोलणे योग्य नाही. पण मंत्रालयात स्वतःच्याच मंत्र्यांवर असा छापा घालणं धक्कादायक आहे. जेव्हा तुम्ही मुख्यमंत्री असता तेव्हा तुम्ही राज्याचे मुख्यमंत्री असता, पक्षाचे नसता. मंत्री हा पक्षाचा नसतो. तर तुमच्या कॅबिनेटचा असतो, असे सुप्रिया सुळे यांनी बोलताना स्पष्टपणे सांगितले आहे.**



# दहावी विद्यार्थ्यांचा भावनिक शुभचिंतन समारंभ उत्साहात संपन्न



**मालखेड (दै. आरंभ पर्व)**

काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय, मालखेड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शुभेच्छांचा वर्षाव मालखेड (ता. हवेली) – काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय मालखेड येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभ उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संस्थेचे व्यवस्थापक मा. रवींद्र पंत जगताप उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून चैतन्य सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजीचे मा. देशपांडे साहेब, भोसले सर, विष्णू सर, खानापूर पीएचसीचे राठोड सर, मालखेडचे सुपुत्र व विद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. धनराज किसनबाप्पू जोरी, विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. नंदकुमार बारवकर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मालखेडचे राकेश बादशाह सर यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता सरस्वती तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत चंदूकाका जगताप यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. विद्यार्थिनींनी स्वागतगीत व ईशस्तवन सादर करून वातावरण भक्तिमय केले. उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.


प्रास्ताविकात मुख्याध्यापक नंदकुमार बारवकर यांनी विद्यालयाचा चढता आलेख मांडत एसएससी बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांनीही दहावीच्या विद्यार्थ्यांना मनोगतातून शुभेच्छा दिल्या. श्रीमती कोमल भालेराव, श्रीमती कृष्णाप्रिया गोलांडे, ज्येष्ठ शिक्षक विलास जोरी सर व श्री शंकर भगत सर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. दहावीचे वर्गशिक्षक विलास जोरी यांनी सादर केलेल्या कवितागायनामुळे सभागृहात भावनिक वातावरण निर्माण झाले आणि विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले.

प्रमुख पाहुणे देशपांडे साहेब यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत विद्यालय व शिक्षकवर्गाचे कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात रवींद्र पंत जगताप यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी व त्यांच्या वर्गशिक्षक श्री. भगत सर यांच्या मार्गदर्शनाखाली केली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनुष्का पवार व कु. स्नेहा पवळे यांनी केले.

विद्यालयातील श्री शंकर भगत, श्री विलास जोरी, श्री अजित वळवी, श्री भास्कर गवळी, श्री अशोक खोमणे, श्रीमती कृष्णाप्रिया गोलांडे, श्रीमती कोमल भालेराव, श्री सचिन जोरी व श्रीमती रजनी भालेराव यांच्या नियोजन व सहकार्याने कार्यक्रम अत्यंत सुंदर व यशस्वीरीत्या पार पडला.

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी हा समारंभ प्रेरणादायी व अविस्मरणीय ठरला.

## आजपासून पुण्यात ‘लेन्सकेप केरळ’ छायाचित्र प्रदर्शन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

‘केरळ टुरिझम’ तर्फे ‘लेन्सकेप केरळ’ या विशेष छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. आजपासून सुरु होणाऱ्या या प्रदर्शनात दहा नामवंत छायाचित्रकारांनी संपूर्ण केरळमध्ये टिपलेल्या १०० निवडक छायाचित्रांचा संग्रह सादर केला जाणार आहे. केरळमधील लोकांचे वैविध्यपूर्ण जीवन, संस्कृती, निसर्गसौंदर्य, वन्यजीव आणि दैनंदिन क्षण अशा विविध विषयांना या प्रदर्शनात स्थान देण्यात आले आहे. दहा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून साकारलेले हे प्रदर्शन ‘गॉड्स ओन कंट्री’ म्हणजेच केरळचे एक चैतन्यमय आणि आधुनिक रूप प्रेक्षकांसमोर उभे करते. हे प्रदर्शन १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान सकाळी ११:०० ते रात्री ८:०० वाजेपर्यंत राजा रवि वर्मा गॅलरी, पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्र, घोले रोड, शिवाजीनगर येथे असणार आहे या प्रदर्शनात प्रवेश विनामूल्य आहे. प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी (१९ फेब्रुवारी) प्रसिद्ध छायाचित्रकार सौरभ आनंद चॅटर्जी आणि बालन माधवन यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष 'फोटोग्राफी मास्टरक्लास' आयोजित केला जाईल.

# तरुणीचं आई आणि भावासमोर अपहरण

### इंदापुरात अतिशय भयानक आणि डोकं चक्रावणारी घटना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुरोगामी ख्याती असलेल्या महाराष्ट्रात महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्यात महिला आणि मुलींच्या विनयभंगाच्या आणि अत्याच्याराच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. पोलिसांकडून या प्रकरणातील आरोपींच्या विरोधात कठोरात कठोर शिक्षा केली जात असली तरी गुन्हेगारीच्या घटना काही केल्या कमी होताना दिसत नाहीत. इंदापुरातून तर अतिशय भयानक आणि डोकं चक्रावणारी घटना समोर येत आहे. इंदापुराच्या भिगवण परिसरात आई आणि भावाच्या डोळ्यांसमोर तरुणीचं अपहरण झाल्याचा धक्कादायक आणि सतापनजक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे आरोपींना कायद्याचं भय राहिलेलं नाही का? असा प्रश्न निर्माण होत आहे. या घटनेप्रकरणी गुन्हा दाखल झाला



आहे. अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी या घटनेवर सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे.

"या प्रकरणी अपहरणाचा गुन्हा दाखल झाला आहे. जाहीर हारून शेख आणि आयान हारून शेख या दोन आरोपींनी दुचाकीवरुन जाणाऱ्या आई, मुलगी आणि तिच्या भावाच्या डोळ्यांत लाल चटणी टाकून त्यांना अडवलं. त्यानंतर त्यांनी 21 वर्षीय मुलीचं अपहरण केल्याबाबत भिगवण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी काही टीम रवाना करण्यात आल्या आहेत. विविध टोल नाके आणि रस्त्यावर असलेले नाकाबंदी या दोन्ही माध्यमातून भिगवण पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत", अशी माहिती अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी दिली आहे.

अपहरणाची ही धक्कादायक घटना भिगवण येथील वार्ड नंबर 5 येथे मंगळवारी (17 फेब्रुवारी) दुपारी चारच्या सुमारास घडली. भर दिवसा हा प्रकार घडल्यामुळे अनेकांकडून आश्चर्य व्यक्त होत आहे. आरोपी मुलीचे इतक्या खुलेपणाने अपहरण करुच कसे शकतात? त्यांना पोलिसांचे भय नाही का? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

या घटनेमध्ये अपहरण करण्यात आलेल्या मुलीचे पाच दिवसांवर लग्न येऊन ठेपले होते आरोपी आणि अपहरण करण्यात आलेली मुलगी एकाच वस्तीवर राहत असल्याने अपहरण नेमके कोणत्या हेतूने करण्यात आले हे स्पष्ट होवू शकले नाही. यासाठी भिगवण पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दक्षता घेण्यात आली आहे. दरम्यान या घटनेनंतर हिंदू राष्ट्र संघटनांकडून उद्या बुधवारी भिगवण बंदची हाक देण्यात आली आहे.

## २५० ग्रामीण महिला उद्योजकांच्या डिजिटल व उत्पन्न क्षमतांना बळ

### नॅसकॉम फाउंडेशनचा उपक्रम; पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये प्रशिक्षण

**पुणे, (दै. आरंभ पर्व)**

ग्रामीण महिला उद्योजकांना डिजिटल अर्थव्यवस्थेत सक्षम करण्यासाठी नॅसकॉम फाउंडेशनने टिएटोच्या सहकार्याने २५० महिलांना प्रशिक्षण दिले. या उपक्रमाचा उद्देश त्यांच्या व्यावसायिक क्षमता मजबूत करणे आणि डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करून उत्पन्नवाढ साधणे हा होता.

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, चाकण, हवेली, जुन्नर, खेड आणि मंचर या भागांमध्ये राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमाद्वारे हस्तकला, हातमाग, उत्पादन व प्रक्रिया क्षेत्रातील महिला उद्योजकांना मार्गदर्शन करण्यात आले. ५० तासांच्या प्रशिक्षक-नेतृत्वाखालील प्रशिक्षणातून सहभागी महिलांनी डिजिटल व आर्थिक साक्षरता, ऑनलाइन पेमेंट, सोशल कॉमर्स, डिजिटल मार्केटिंग, ई-अकाउंटिंग आणि सरकारी योजनांविषयी माहिती अशी कौशल्ये आत्मसात केली.

**या उपक्रमामुळे जवळपास निम्म्या महिला उद्योजकांच्या मासिक उत्पन्नात वाढ झाली असून सामाजिक वाणिज्य प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून विक्रीतही वाढ झाली आहे. औपचारिक बँकिंग सेवा, एटीएम कार्ड वापर आणि डिजिटल बुककीपिंगचा स्वीकार वाढल्याने व्यवसाय अधिक संघटित व शाश्वत होत असल्याचेही निदर्शनास आले. ग्रामीण भागातील महिलांना तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी आवश्यक कौशल्ये देत हा उपक्रम डिजिटल दरी कमी करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरत असल्याचे नॅसकॉम फाउंडेशनने नमूद केले.**

नॅसकॉम फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी ज्योती शर्मा म्हणाल्या, “डिजिटल सक्षमीकरणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास आणि आर्थिक स्वावलंबन वाढते. या सहकार्यामुळे २५० महिला उद्योजकांना डिजिटल साधनांचा वापर करून उत्पन्ननिर्मिती, बाजारपेठेत प्रवेश आणि व्यवसाय निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे शक्य झाले आहे.”

टिएटो इंडियाचे संचालक व फायनान्स ऑपरेशन्स प्रमुख अश्वनी बत्रा यांनी सांगितले, “तंत्रज्ञान व्यावहारिक आणि सर्वसमावेशक असेल तरच त्यातून खरे मूल्य निर्माण होते. या उपक्रमाद्वारे ग्रामीण महिला उद्योजकांना पेमेंट, मार्केटिंग आणि व्यवसाय व्यवस्थापनासाठी डिजिटल साधनांचा आत्मविश्वासाने वापर करता येत आहे.”

प्रशिक्षणानंतर महिलांमध्ये डिजिटल साधनांचा वापर लक्षणीयरीत्या वाढल्याचे दिसून आले. ९० टक्क्यांहून अधिक महिला डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म वापरत आहेत, तर ८६ टक्क्यांहून अधिक महिला स्वतःचे व्यवसाय व्यवहार स्वतंत्रपणे व्यवस्थापित करत आहेत. स्मार्टफोन आणि इंटरनेटच्या वापरामुळे ग्राहकांशी थेट संपर्क साधणे व सोशल मीडियाद्वारे व्यवसायाचे प्रमोशन करणे अधिक सोपे झाले आहे.

## नॅशनल लेव्हल अबॅकस व वैदिक मॅथ्स स्पर्धेत संकल्प स्कूलचे उत्तुंग यश



**नऱ्हे मानाजीनगर (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे मानाजी नगर, येथील संकल्प स्कूलने नुकत्याच झालेल्या नॅशनल लेवल अबॅकस व वैदिक मॅथ्स स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. शाळेच्या एकूण ६ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील आयोजित स्पर्धेमध्ये बाजी मारली. मुलांच्या बुद्धीला चालना देऊन गणितीय प्रक्रिया अवघ्या काही मिनिटांत पूर्ण करण्यासाठी अबॅकस व वैदिक मॅथ्स सारख्या परीक्षा या उपयुक्त ठरत असतात. या स्पर्धेमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घेतली आहे. विजेत्या स्पर्धकांची नावे पुढील प्रमाणे- वैदिक मॅथ्स- सार्थक नाकती, हंसिका कुमेरिया, कुणाल गावडे. अबॅकस - अर्णव पुदे, ध्रुव सुतार, रियांश खाळेकर त्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या संचालिका सौ. राधिका गिरमे मॅडम व संस्थेचे अध्यक्ष श्री निलेश गिरमे सर यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना सौ. विद्या घनवट सौ.शुभांगी पूदे, चारुशीला सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले.

## हवेली परिसरात अवैध दारू-ताडी विक्री; कारवाईबाबत प्रश्नचिन्ह



**खानापूर (दै. आरंभ पर्व)**

हवेली तालुक्यात काही भागांत अवैध दारू व ताडी विक्री सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून पुढे येत आहेत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार उघडपणे विक्री होत असतानाही अपेक्षित ती कारवाई होत नसल्याने प्रश्न उपस्थित होत आहेत.

खानापूर - Maharashtra Prohibition Act नुसार परवानगीशिवाय दारू तयार करणे, साठवणे किंवा विक्री करणे हा दंडनीय गुन्हा आहे. कायद्यानुसार पोलिसांना छापे टाकणे, मुद्देमाल जप्त करणे व गुन्हे दाखल करण्याचे अधिकार आहेत.स्थानिक नागरिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. “आमच्या परिसरात उघडपणे अवैध दारू व ताडी विक्री सुरू आहे. यामुळे तरुण पिढी बिघडत आहे. अनेक वेळा तोंडी सांगूनही ठोस कारवाई होत नाही. पोलिसांनी तातडीने छापे टाकून कारवाई करावी,” अशी मागणी एका संतप्त नागरिकाने केली. दरम्यान, नागरिकांनी संबंधित माहिती लेखी स्वरूपात पोलिसांकडे देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. आवश्यक असल्यास Maharashtra Police यांच्या हेल्पलाईन 112 वर किंवा Pune Rural Police यांच्याकडे तक्रार दाखल करता येते. अवैध व्यवसायावर तातडीने आळा घालून कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पार्ले ॲग्रोचे ‘स्मूध केसर बदाम’ लॉंच

### डेअरी बेव्हरेज पोर्टफोलिओमध्ये क्लासिक भारतीय फ्लेवरची भर




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील अग्रगण्य पेय कंपनी पार्ले ॲग्रोने आपल्या फ्लॅगशिप डेअरी बेव्हरेज ब्रँड ‘स्मूध’ अंतर्गत ‘स्मूध केसर बदाम’ हे नवीन उत्पादन लॉंच केले आहे. बदामाची समृद्धता आणि केशरची ऊब यांचा संगम असलेला हा फ्लेवर्ड मिल्क पर्याय ग्राहकांना प्रीमियम आणि आल्हाददायक अनुभव देण्याच्या उद्देशाने सादर करण्यात आला आहे.

स्मूधच्या फ्लेवर्ड मिल्क पोर्टफोलिओमध्ये क्लासिक केसर बदाम चव समाविष्ट करत ग्राहकांसाठी आणखी एक पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. बदामाचे गुणधर्म, केशरचा सुगंध आणि मऊ, क्रीमी दुधाचा मिलाफ स्मूधच्या खास शैलीत सादर करण्यात आला आहे. सण, कुटुंबीयांची भेट, संध्याकाळचा आस्वाद किंवा दिवसभरातील ताजेतवाने पेय म्हणून हे उत्पादन उपयुक्त ठरेल, असे कंपनीने म्हटले आहे. हे उत्पादन ८० मि.ली.साठी १० रुपये आणि १५० मि.ली.साठी २० रुपयांच्या किमतीत उपलब्ध आहे.

लॉंचबाबत पार्ले ॲग्रोच्या संयुक्त व्यवस्थापकीय संचालक व सीएमओ नादिया चौहान म्हणाल्या, “स्मूधने डेअरी-आधारित पेये अधिक सुलभ करत या श्रेणीला नवे रूप दिले आहे. केसर बदाम हा सांस्कृतिक महत्त्व असलेला आणि सर्वांना आवडणारा फ्लेवर असल्याने तो आमच्या पोर्टफोलिओमध्ये नैसर्गिक भर ठरला. या लॉंचमुळे पारंपरिक स्वाद आधुनिक ‘ऑन-द-गो’ फॉरमॅटमध्ये ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे.”

स्मूध केसर बदाम शहरी आणि ग्रामीण बाजारपेठांमध्ये जनरल ट्रेड, मॉडर्न ट्रेड तसेच डिजिटल व क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर विविध पॅक स्वरूपात उपलब्ध होणार आहे. या लॉंचला आउट-ऑफ-होम जाहिराती, डिजिटल प्लॅटफॉर्म्स, सोशल मीडिया, इन्फ्लुएंसर भागीदारी आणि इन-स्टोअर प्रमोशन अशा एकात्मिक मार्केटिंग मोहिमेचा पाठिंबा देण्यात येणार आहे.

फ्लेवर्ड मिल्क विभागात ग्राहकांचा वाढता कल लक्षात घेऊन पार्ले ॲग्रोने हा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. सध्या स्मूध ब्रँडअंतर्गत चॉकलेट, चॉकलेट हेझलनट, टॉफी कॅरामल आणि नव्याने लॉंच केलेले केसर बदाम असे विविध फ्लेवर्स उपलब्ध आहेत. फ्लेवर्ड मिल्क व लस्सी विभागात कंपनीची उपस्थिती सातत्याने वाढत असल्याचेही कंपनीने स्पष्ट केले.

पार्ले ॲग्रो ही भारतातील प्रमुख पेय कंपनी असून फ्रूट ज्युस आधारित पेये, स्पार्कलिंग ड्रिंक्स, पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर, कार्बोनेटेड पेये आणि डेअरी उत्पादने अशा विविध श्रेणींमध्ये कंपनीची उत्पादने उपलब्ध आहेत. देश-विदेशातील ८४ उत्पादन सुविधा आणि १.९ दशलक्षाहून अधिक विक्री केंद्रांमार्फत कंपनीची सेवा पोहोचत आहे. ‘फ्रूटी’, ‘ॲप्पी’, ‘ॲप्पी फिझ्झ’, ‘बी फिझ्झ’, ‘स्मूध’, ‘बेली’ आदी ब्रँड्ससह पार्ले ॲग्रो नवकल्पनांवर आधारित वाढ साधत असल्याचे कंपनीने नमूद केले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### वार्षिक पगारवाढ दोन वर्षांपासून रखडली? कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी

**मालखेड (आरंभ पर्व) :** देशातील अग्रगण्य पोल्ट्री उद्योग समूह म्हणून ओळख असलेल्या Venkateshwara Hatcheries Pvt. Ltd. (वेंकटेशश्वरा ग्रुप) कंपनीत वार्षिक पगारवाढ मागील दोन वर्षांपासून रखडल्याची चर्चा सध्या कर्मचाऱ्यांमध्ये जोर धरू लागली आहे. नियमित पगारवाढ ही कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन, प्रेरणा आणि आर्थिक स्थैर्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र सलग दोन वर्षे वाढ न झाल्याने अनेक कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याचे समजते. काही कर्मचाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, वाढती महागाई, घरखर्च आणि शैक्षणिक जबाबदाऱ्या सांभाळताना पगारवाढ न मिळाल्याने आर्थिक ताण वाढत आहे. “कामाची जबाबदारी वाढतेय, पण त्यानुसार मोबदला मिळत नाही,” अशी भावना कर्मचाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. दरम्यान, कंपनी प्रशासनाकडून याबाबत अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट करण्यात आलेली नसल्याने संभ्रम कायम आहे. व्यवस्थापनाने लवकरच यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांचा विश्वास कायम ठेवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वार्षिक पगारवाढीचा प्रश्न लवकर निकाली निघाला नाही, तर त्याचा परिणाम कामाच्या वातावरणावर आणि उत्पादकतेवर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आता सर्वांचे लक्ष कंपनी व्यवस्थापनाच्या भूमिकेकडे लागले आहे.

### वासुदेव बळवंत फडके यांच्या पुण्यदिनानिमित्त पुण्यात आदरांजली



**पुणे (आरंभ पर्व) :** भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आद्य क्रांतिकारक आणि सशस्त्र क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाणारे वासुदेव बळवंत फडके यांच्या पुण्यदिनानिमित्त संगमवाडी ब्रीजजवळील त्यांच्या स्मारकस्थळी अभिवादन करण्यात आले.फडके स्नेहवर्धिनी तर्फे आयोजित या कार्यक्रमात योगशिक्षक सुभाष बाळकृष्ण फडके, दत्तात्रय लक्ष्मण फडके, चंद्रकांत प्रभाकर फडके, चंद्रकांत दत्तात्रय फडके, दिगंबर गोपाळ फडके, सौ. सुलभा लिमये तसेच श्री व सौ. नंदकिशोर फडके यांनी उपस्थित राहून स्मारकाला पुष्पांजली अर्पण केली. यावेळी उपस्थितांनी वासुदेव बळवंत फडके यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील कार्याची आठवण करून त्यांच्या त्याग व देशभक्तीला अभिवादन केले. त्यांच्या विचारांवर चालत राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला.

### बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना हेक्टरी ३० हजार रुपये पिक विमा मिळावा



• शेतकऱ्यांची निवेदनाद्वारे मागणी

**बार्शी (आरंभ पर्व) :** बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०२५ वर्षातील खरीप हंगामातील पिकासाठी हेक्टरी ३० हजार रुपये पीक विमा मिळावा. अशा मागणीचे निवेदन तालुक्यातील शेतकऱ्यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांना दिले आहे. तालुक्यात गेल्या वर्षीच्या तुलनेने चालू वर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. सन २०२५ मधील खरीप हंगामात अतिवृष्टी आणि सततच्या पावसाने सोयाबीन व इतर पिकाचे खूप मोठे नुकसान झाले होते. या पिकांच्या नुकसानीमुळे राज्य शासनाने खरीप पिकासाठी शेतकऱ्यांना अनुदान देखील देण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी पिक विमा भरलेला आहे त्या शेतकऱ्यांना पिक विमा कंपनीकडून खरीप हंगाम २०२५ मधील सोयाबीन व इतर पिकासाठी हेक्टरी ३० हजार रुपये पिक विमा मिळावा अशी मागणी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सोलापूर यांना राहुल भड, अशोक माळी, उमेश सुतार, संजय माळी, महेश भड आदी शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.






दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६














# पुण्यात हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील सुरक्षितता, अनुपालन आणि शाश्वत पद्धतींसाठी 'सक्षम' उपक्रमाची घोषणा

## एलनप्रोचा ज्ञानाधारित उद्योग उपक्रम; फूड सेफ्टी आणि ऑपरेशनल मानकांवर विशेष भर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील फूड सर्व्हिस आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्र नव्या फॉरमॅट्समुळे वेगाने विस्तारत असताना सुरक्षित कार्यपद्धती, नियमांचे पालन आणि शाश्वत पायाभूत सुविधा यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर कमर्शियल रेफ्रिजरेशन सोल्यूशन्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी एलनप्रोने 'सक्षम' या ज्ञानाधारित उद्योग उपक्रमाच्या पुणे आवृत्तीची घोषणा केली. पत्रकार परिषदेत उपक्रमाचे उद्दिष्ट, उद्योगासाठीचे महत्त्व आणि अपेक्षित परिणाम याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी एलनप्रोचे संचालक संजय जैन, हॉस्पिटॅलिटी कन्सल्टंट्स फोरमचे अध्यक्ष पी. श्रवण कुमार तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते. तज्ज्ञांच्या मते, फूड व्यवसाय झपाट्याने वाढत असला तरी तापमान नियंत्रण, रेफ्रिजरेशन देखभाल आणि ऑडिट तयारी यांसारख्या महत्त्वाच्या बाबींमध्ये सातत्याचा अभाव दिसून येतो. यामुळे अन्नसुरक्षेचे धोके, अनावश्यक नुकसान आणि आर्थिक ताण वाढण्याची शक्यता असते.

'सक्षम' पुणे अंतर्गत शेफ, हॉटेल इंजिनिअर्स, फूड बिझनेस ऑपरेटर्स, फॅसिलिटी मॅनेजर्स आणि अनुपालन तज्ज्ञांसाठी मार्गदर्शित सत्रे आणि उद्योग संवाद आयोजित करण्यात येणार आहेत. ही सत्रे प्रत्यक्ष कामकाजातील अडचणी व उपायांवर आधारित असतील.

- एकदिवसीय कार्यक्रमात तीन प्रमुख विषयांवर भर असेल
- फूड सेफ्टी आणि स्वच्छता अनुपालन तयारी
- शाश्वत हॉस्पिटॅलिटी संचालन

तापमान व्यवस्थापन, अन्नाच्या गुणवत्तेत रेफ्रिजरेशनची भूमिका, प्रिव्हेंटिव्ह मेंटेनन्स, किचन रिस्क कंट्रोल, ग्रीस व वेस्टवॉटर व्यवस्थापन, तसेच नियमांचे पालन न केल्यास होणारे आर्थिक परिणाम यावर सविस्तर चर्चा होणार आहे. पॅनेल चर्चांमधून उपकरणांची निवड आणि SOP चा सुरक्षिततेवर होणारा परिणामही स्पष्ट केला जाणार आहे.

संजय जैन म्हणाले, "फूड व्यवसाय मोठ्या प्रमाणात आणि वेगाने वाढत आहे. सुरक्षित व टिकाऊ वाढीसाठी मजबूत कार्यप्रणाली आणि योग्य तांत्रिक निर्णय अत्यावश्यक आहेत. 'सक्षम'चा उद्देश म्हणजे उद्योग मानके प्रत्यक्ष कामात कशी उतरवायची याचे व्यवहार्य मार्गदर्शन देणे." पी. श्रवण कुमार म्हणाले, "उद्योग वाढत असताना फूड सेफ्टी आणि अनुपालनाची मूलभूत समज अधिक मजबूत होणे गरजेचे आहे. 'सक्षम'सारखे ज्ञान मंच व्यावसायिक मानके उंचावण्यास मदत करतात."

पत्रकार परिषदेत हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, क्लाऊड किचन, फूड रिटेल आणि क्विक कॉमर्स डार्क स्टोअर्समध्ये अन्नसुरक्षा, ऑडिट अनुपालन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी कमर्शियल रेफ्रिजरेशन प्रणाली किती महत्त्वाची ठरत आहे, यावरही भर देण्यात आला. कंपनीकडून कोल्ड रूम्स, वापरानुसार डिझाइन केलेल्या कूलिंग सोल्यूशन्स आणि ऊर्जा बचत करणाऱ्या प्रणाली उपलब्ध करून दिल्या जात असल्याची माहिती देण्यात आली.

## 'कूल स्किल्स ब्राइट फ्यूचर'द्वारे कौशल्य विकास

**एलनप्रोच्या 'कूल स्किल्स ब्राइट फ्यूचर' या कौशल्य विकास उपक्रमाची प्रगतीही यावेळी मांडण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत नवोदित तंत्रज्ञांना कमर्शियल रेफ्रिजरेशन आणि सुरक्षित कूलिंग पद्धतींबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. आतापर्यंत २०० हून अधिक तरुणांनी या उपक्रमाचा लाभ घेतला आहे. उद्योगासाठी प्रशिक्षित तांत्रिक मनुष्यबळ तयार करणे आणि रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करणे हा यामागील उद्देश आहे.**

# सुरेल बंदिशी, मनमोहक चित्रांतून रंगले 'रामगान'




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विविध रागांमध्ये गुंफलेल्या बंदिशी, कलाकारांचे कर्णमधुर सादरीकरण, सुरेल बंदिशींना प्रासंगिक चित्रांची जोड यातून भारतीय शास्त्रीय संगीत, चित्रकला आणि रामायणातील अध्यात्मिक भावविश्व यांचा अनोखा संगम पुणेकरांनी अनुभवला. बंदिशकार, गायिका व चित्रकार भाग्यश्री गोडबोले यांनी रामायणातील प्रसंगांवर रचलेल्या शास्त्रीय बंदिशी व त्यांनीच साकारलेल्या चित्रांचे प्रदर्शन अशा दृकश्राव्य स्वरूपातून रसिकांनी 'रामगाना'ची रसानुभूती घेतली.

आविष्कार क्रिएशन्सतर्फे आयोजित 'रामगान' या सांगितीक मैफिलीचे नुकतेच आयोजन केले होते. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात रसिकांनी रामायणातील विविध प्रसंगांवर आधारित 'रामगाना'ची रसानुभूती घेतली. राम जन्मापासून ते रावणवध करून प्रभू श्रीराम अयोध्येला परतल्यानंतर त्यांचा राज्याभिषेक होईपर्यंत, वनवासावेळी माता शबरीची भेट, अहिल्या उद्धार, सीताहरण, सीतेला शोधतानाचा विरह, राम हनुमान भेट, विजयी पताका व जयघोष असे अनेक शब्दबद्ध व चित्रबद्ध केलेले प्रसंग पाहून रसिक भारावून गेले. पं. अमोल निसळ, सावनी दातार, डॉ. सानिका गोरेगावकर, श्वेता अभिषेक, स्वानंदी सडोलीकर आणि स्वतः भाग्यश्री गोडबोले यांनी बंदिशींचे सादरीकरण केले. भटियार, केदार, मालकंस, हिंडोल, ललत, भूपेश्वरी, जौनपुरी, जनसंमोहिनी, जयजयवंती, मारवा, बिलासखानी तोडी, शुद्ध सारंग, मधुकंस, झिंझोटी, सोहोनी आणि भैरवी अशा सोळा रागांतील रचनांनी कार्यक्रमात वैविध्यपूर्ण रसोत्पत्ती निर्माण केली. खुमासदार शैलीतील सुंदर निरूपण डॉ. सुनील देवधर यांनी केले. अमित जोशी यांचे संगीत संयोजन, तर अमित जोशी, मनोज भांडवलकर, दिप्ती कुलकर्णी, प्रज्ञा देसाई आणि वसंत देव यांनी वाद्यांवर साथसंगत केली. प्रास्ताविक धनश्री करंबेळकर यांनी केले. 'रघुनंदन रूप मनोहर' या भटियार, ललत रागातील बंदिशीने मैफलीची सुरुवात झाली. केदार रागातील 'प्रकट होत खुद' ही बंदिश श्वेता अभिषेक यांनी, तर मालकंस रागातील 'कड कड कड नाद' ही बंदिश अमोल निसळ यांनी जोशपूर्ण सादर केली. वनवासाचे वर्णन करणाऱ्या हिंडोल रागातील 'राम का हो निर्वासन' व जयजयवंती रागातील 'सीताहरण की बात' बंदिशी स्वानंदी सडोलीकर यांनी सादर केल्या. 'गमन करत रामलखन' या ललत रागातील भावस्पर्शी बंदिशीतून सावनी दातार यांनी वनवासाचा प्रसंग उभा केला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सॅमसंग गॅलेक्सीची नवी श्रेणी, २५ फेब्रुवारीला होणार लॉंन्च

**पुणे (आरंभ पर्व) : सॅमसंग गॅलेक्सीची नवी एस श्रेणी दाखल होणार असून यामुळे एआयचा अनुभव यामुळे अधिक सुसज्ज होणार आहे. सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स सॅन फ्रान्सिस्कोमध्ये गॅलेक्सी अनपॅकचे आयोजन करणार आहे. या इव्हेण्टचे सॅमसंगच्या संकेतस्थळावर तसेच सॅमसंग न्यूजरूम इंडिया आणि सॅमसंगच्या यूट्यूब चॅनेलवर भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ११.३० वाजता लाइव्ह स्ट्रिमिंग करण्यात येणार आहे. नव्या स्मार्टफोनसंदर्भात उपलब्ध असलेल्या विशेष फायद्यांबाबत माहिती मिळवण्यासाठी samsung.com/unpacked येथे नोंदणी करण्याचे आवाहन कंपनीतर्फे करण्यात आले आहे.**

### संविधान, न्याय आणि संघर्षाची कहाणी




**पुणे (आरंभ पर्व) : संविधानाची ताकद, कायद्याची धार आणि अन्यायाविरोधातील लढ्याची धग यांचा संगम असलेला कलम का बादशाह हा नवा मराठी सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. निर्माता व्हि. एम. भैलुमे आणि दिग्दर्शक आनंदकुमार सरवदे यांच्या टीमने साकारलेला हा चित्रपट सामाजिक आशय, थरार आणि विचारप्रवर्तक कथानक यामुळे चर्चेत आला आहे. सत्तेला प्रश्न विचारणारी आणि सामान्य माणसाच्या हक्कांसाठी उभा राहणारी ही कथा 'दीक्षा' आणि 'जय' या दोन तरुणांच्या संघर्षाभोवती फिरते. अन्याय, भीती आणि सत्तेच्या दबावासमोर न झुकता ते संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांच्या आधारे लढा उभारतात. कायदा हेच त्यांचे शस्त्र ठरते, तर धैर्य ही त्यांची खरी ताकद बनते. व्यवस्थेतील त्रुटींना भिडणारी ही कथा केवळ मनोरंजनापुरती न राहता समाजाला विचार करायला भाग पाडणारी ठरते. चित्रपटात अभिनेत्री मोनालिसा बागल, यश डिंबळे, आनंद शिंदे आणि जय मोर्या यांच्या प्रमुख भूमिका आहेत. २०२३ मधील 'रावरंभा'नंतर काही काळ पडद्यापासून दूर राहिलेली मोनालिसा बागल 'कलम का बादशाह'मधून पुन्हा एकदा दमदार भूमिकेत दिसणार असून तिच्या कमबॅककडे प्रेक्षकांचे विशेष लक्ष लागले आहे. अभिनयातील प्रामाणिकता, भावनांची प्रभावी अभिव्यक्ती आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण ही तिची ओळख पुन्हा एकदा या चित्रपटातून पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. आर. बी. फिल्म्स प्रॉडक्शनच्या बॅनरखाली साकारलेल्या या सिनेमाचे छायाचित्रण मनीष वि. सोनी यांनी केले असून पटकथा व संवाद कल्पेश जगताप यांनी लिहिले आहेत.**

# बौद्ध समाजाला दूर ठेवू नका; अन्यथा परिणाम भोगावे लागतील

## पत्रकार विशाल भालेराव



**खानापूर (दै. आरंभ पर्व)**

राजकीय पक्षांनी केवळ मतांसाठी बौद्ध समाजाचा वापर करण्याची भूमिका आता चालणार नाही. बौद्ध वस्त्यांमध्ये प्रत्यक्ष विकासकामे करून विश्वास जिंकावा, अन्यथा आगामी काळात त्याचे राजकीय परिणाम भोगावे लागतील, असा इशारा पत्रकार विशाल भालेराव यांनी दिला आहे.

ग्रामीण व शहरी भागातील अनेक बौद्ध वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, गटारव्यवस्था, आरोग्य व शिक्षणाच्या सुविधा अपुऱ्या असल्याचे चित्र दिसते. निवडणूक काळात मोठ्या आश्वासनांची सरबत्ती केली जाते; मात्र निवडणुका संपल्यानंतर या वस्त्यांकडे दुर्लक्ष केले जाते, अशी नाराजी समाजबांधवांमध्ये वाढत आहे.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समतेचा आणि राजकीय सक्षमीकरणाचा संदेश दिला. त्याच विचारांच्या आधारे बौद्ध समाजाने शिक्षण, संघटन आणि संघर्षाच्या माध्यमातून आपली ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे केवळ मतपेटीपुरते राजकारण नको, तर प्रत्यक्ष विकासकामांद्वारे विश्वास संपादन करणे गरजेचे आहे, अशी भूमिका व्यक्त होत आहे. "मतासाठी वापर पुढे होणार नाही. बौद्ध वस्त्यांमध्ये काम दाखवा," असे स्पष्ट मत पत्रकार विशाल भालेराव यांनी मांडले. त्यांनी सर्व पक्षांना आवाहन केले की, समाजाला केवळ मतदानाच्या दिवशी आठवू नका; तर पाच वर्षे सातत्याने संवाद आणि विकासाची कामे करा.

राजकीय विश्लेषकांच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर बौद्ध समाज निर्णायक भूमिका बजावू शकतो. त्यामुळे सामाजिक समावेशकता, पारदर्शक निधीवाटप आणि वस्तीनिहाय विकास आराखडा तयार करणे ही काळाची गरज आहे. एकूणच, बौद्ध समाजाला मुख्य प्रवाहात समान सन्मान व प्रतिनिधित्व देणे हे केवळ नैतिकच नव्हे तर राजकीय दृष्ट्याही आवश्यक असल्याचे या भूमिकेतून अधोरेखित झाले आहे.






# 'सेवा फेस्ट २०२६' उत्साहात; नागरिकांची सहकुटुंब उपस्थिती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे वर्ष 'International Year of Volunteering' म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर सेवा सहयोग फाऊंडेशन आयोजित "सेवा फेस्ट – २०२६ : उत्सव सेवेचा" हा भव्य सामाजिक महोत्सव सिंहगड रोड येथील 'कलाग्राम'मध्ये उत्साहात पार पडला.

सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या महोत्सवाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, स्वयंसेवक, सामाजिक संस्था प्रतिनिधी, सीएसआर अधिकारी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सुमारे सात हजारांहून अधिक नागरिकांनी कुटुंबासह भेट देत उपक्रमांचा अनुभव घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात विविध सेवा क्षेत्रात कार्यरत मान्यवरांच्या प्रेरणादायी मनोगतांनी झाली.



यावेळी गरवारे टेक्निकल कॉलेजचे अध्यक्ष विवेक कुलकर्णी, के.जे. ग्रुप ऑफ इंजिनियरिंगचे विनोद जाधव, इन्फोसिसचे प्लांट डीसी हेड प्रवीण कुलकर्णी, सेवा सहयोग फाऊंडेशनचे संचालक किशोर मोघे आणि सेवा फेस्ट २०२६चे प्रकल्प समन्वयक विनीत कोंडेजकर उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात प्रवीण कुलकर्णी यांनी स्वयंसेवकांनी कुटुंबासह सेवा उपक्रमांत सहभागी व्हावे, यावर भर दिला. स्वयंसेवेचा संस्कार लहानपणापासून मुलांमध्ये रुजल्यास सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक बळकट होते, असे त्यांनी नमूद केले. "समुत्कर्ष" प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सृजनशील कार्यक्रमांनी उत्सवाची प्रेरणादायी सुरुवात झाली.

उत्सवादरम्यान "किशोरी विकास" माहिती पुस्तिका, "चेतना" प्रकल्पाचे पुस्तक तसेच "महिला सक्षमीकरण दशकपूर्ती" पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महिला बचत गटांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तू आणि खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सना नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. सेवा सहयोगच्या विविध प्रकल्पांचे एकूण ३९ स्टॉल्स उभारण्यात आले होते. या माध्यमातून सामाजिक उपक्रम, यशोगाथा, प्रशिक्षण आणि जनजागृती यांची माहिती देण्यात आली. "सीएसआर मीट", "एज्युकेशन मीट" आणि "सेवा कट्टा" या संवाद सत्रांतून सामाजिक क्षेत्रातील विविध विषयांवर चिंतन आणि मार्गदर्शन झाले. समस्यांवर उपाययोजना आणि भविष्यातील दिशा यावरही चर्चा करण्यात आली.

या महोत्सवाला खासदार मेधा कुलकर्णी, नगरसेवक कुणाल टिळक तसेच लेखक-दिग्दर्शक किरण यज्ञोपवित यांनी भेट देत सेवा सहयोगच्या सातत्यपूर्ण समाजकार्याचे कौतुक केले.

उत्सवादरम्यान उपस्थित स्वयंसेवक आणि नागरिकांनी समाजाच्या भल्यासाठी शाश्वत बदल घडविण्यासाठी सक्रिय सहभाग घेण्याची "सेवा प्रतिज्ञा" घेतली. स्वयंसेवकांचा ध्यास, समर्पण आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी या महोत्सवातून प्रकर्षाने जाणवली.

"सेवा फेस्ट २०२६" हा केवळ एक कार्यक्रम न राहता समाजातील माणसांना एकमेकांशी जोडणारी आणि स्वयंसेवेची प्रेरणा देणारी सशक्त चळवळ ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल संघांचा दुसरा विजय

पुणे (आरंभ पर्व) : द पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन (पीबीएमए) आणि ब्लाईंड क्रिकेट असोसिएशन (बीसीए) तर्फे एचसीएलफाऊंडेशन च्या सहकाऱ्याने आयोजित राष्ट्रीय टी20 क्रिकेट फॉर द व्हिज्युअली इम्पेअर्ड स्पर्धेत गट साखळी फेरीत महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल या संघांनी सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली. डेक्कन जिमखाना मैदान व पद्ममावती येथील टेंबेकर मैदान येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत ब गटात अनिल गरिया(138धावा व 5-13) याने केलेल्या धडाकेबाज कामगिरीच्या जोरावर गुजरात संघाने राजस्थान संघाचा 338 धावांनी धुव्वा उडवला. प्रथम फलंदाजी करताना गुजरात संघाने 19 षटकात 2बाद 368धावाचे आव्हान उभे केले. यात अनिल गरियाने 40चेंडूत 30चौकाराच्या मदतीने 138 धावांची शतकी खेळी केली. त्याला गणेश भुसाराने 78धावा, गणेशभाई गणवितने 64धावा, माजी भारतने 54 धावा काढून साथ दिली. या आव्हानाचा पाठलाग करताना राजस्थान संघाचा डाव 5.3षटकात सर्वबाद 30धावावर संपुष्टात आला. विशेष म्हणजे गुजरातच्या अनिल गरियाने पहिल्याच षटकात हॅट्ट्रिक कामगिरी केली. अनिलने 13धावांत 5 गडी बाद करून राजस्थानचा खुर्दा उडवला. त्याला माजी भारतने 13 धावांत 2 गडी बाद साथ देत संघाला 338 धावांनी विजय मिळवून दिला. दुसऱ्या सामन्यात राहुल सोरेन(नाबाद 100 धावा व 2-9) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर पश्चिम बंगाल संघाने चंदीगढ संघाचा 152 धावांनी पराभव केला.

### मुळशीत डंपर घरावर पलटून एका महिलेचा मृत्यू

मुळशी (पुणे) (आरंभ पर्व) : मुळशी तालुक्यात सुरू असलेल्या रिंग रोडच्या कामादरम्यान बुधवारी सकाळी भीषण अपघात घडला. भरावाच्या कामात गुंतलेल्या डंपरचा चालकावरील ताबा सुटून वाहन थेट एका घरावर पलटले. या दुर्घटनेत घरात असलेल्या एका महिलेचा जागीच मृत्यू झाला असून परिसरात शोककळा पसरली आहे. स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, रस्त्याच्या कामासाठी माती टाकत असताना डंपर अचानक घसरला आणि जवळील घरावर पलटला. अपघाताची तीव्रता इतकी होती की घराचा काही भाग कोसळला आणि आत अडकलेल्या महिलांना ग्रामस्थांनी धाव घेत ढिगाऱ्याखालून अडकलेल्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. पोलिस, अग्निशमन दल आणि प्रशासनाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. बचावकार्य पूर्ण झाल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले. मृतांच्या कुटुंबियांना तातडीने मदत आणि योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे. प्रशासनाने याबाबत लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. प्राथमिक माहितीनुसार, रिंग रोडच्या कामादरम्यान सुरक्षा नियमांचे उल्लंघन आणि जड वाहनांची बेफिकीर वाहतूक हे या अपघातामागचे कारण असू शकते.







# ‘एंजल वन सिल्व्हर ईटीएफ’ आणि ‘सिल्व्हर ईटीएफ एफओएफ’ लाँच

## चांदीत गुंतवणुकीसाठी दोन पर्याय; एनएफओ कालावधी जाहीर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एंजल वन ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने ‘एंजल वन सिल्व्हर ईटीएफ’ आणि ‘एंजल वन सिल्व्हर ईटीएफ एफओएफ’ या दोन नव्या गुंतवणूक योजनांच्या लाँचची घोषणा केली आहे. या दोन्ही न्यू फंड ऑफर्स (एनएफओ) ९ फेब्रुवारीपासून गुंतवणुकीसाठी खुल्या झाल्या असून सिल्व्हर ईटीएफचा एनएफओ १९ फेब्रुवारीपर्यंत, तर एफओएफचा एनएफओ २३ फेब्रुवारीपर्यंत खुला राहणार आहे.

या योजनांद्वारे गुंतवणूकदारांना चांदीमध्ये (सिल्व्हर) थेट गुंतवणूक करण्याची संधी उपलब्ध होणार असून देशांतर्गत किमतींचा मागोवा घेणारी पारदर्शक व सोपी गुंतवणूक सुविधा दिली जाणार आहे. ईटीएफच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना एनएसईवर नियमित व्यवहार करता येणार असून एफओएफ योजनेत डिमॅट खाते नसतानाही गुंतवणूक शक्य होणार आहे. सौर ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, डेटा सेंटर्स यांसारख्या क्षेत्रांत वाढणारी मागणी आणि मर्यादित पुरवठा यामुळे चांदीचे महत्त्व वाढत आहे. एएमएफआयच्या आकडेवारीनुसार डिसेंबर २०२५ मध्ये भारतातील सिल्व्हर ईटीएफचा एयूएम ७२ हजार कोटी रुपयांवर पोहोचला आहे. ३१ जानेवारी २०२६ पर्यंतच्या गेल्या दहा वर्षांत चांदीने (रुपयांमध्ये) सुमारे २५.८ टक्के सीएजीआर दराने वाढ नोंदवली आहे, ज्यामुळे पोर्टफोलिओ विविधतेसाठी आणि महागाईच्या काळात संरक्षणासाठी हा पर्याय उपयुक्त ठरत असल्याचे दिसून येते. एंजल वन एएमसीचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर व सीईओ हेमेन भाटिया म्हणाले, “चांदी ही मौल्यवान धातू असण्याबरोबरच आधुनिक जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाची मालमत्ता म्हणून उदयास येत आहे. भावी उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रात वाढती मागणी पाहता दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी चांदी आकर्षक पर्याय ठरत आहे. आमच्या सिल्व्हर ईटीएफ आणि एफओएफच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना पारदर्शक, सोपा आणि किफायतशीर मार्ग उपलब्ध करून देण्याचा आमचा उद्देश आहे.” या दोन्ही योजना चांदीत गुंतवणुकीचा सोयीस्कर आणि किफायतशीर मार्ग उपलब्ध करून देतात. गुंतवणूक काढताना कोणतेही दंड किंवा शुल्क आकारले जाणार नसल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. या लाँचमुळे एंजल वन एएमसीचा गोल्ड ईटीएफ व गोल्ड एफओएफसह निष्क्रिय गुंतवणूक उत्पादनांचा विस्तार होऊन इक्विटी, डेट आणि कमोडिटी मालमत्ता वर्गातील उपस्थिती अधिक मजबूत होणार आहे.

### ठळक वैशिष्ट्ये

- **एंजल वन सिल्व्हर ईटीएफमध्ये एनएफओदरम्यान किमान १,००० रुपये आणि त्यानंतर १ रुपयांच्या पटीत गुंतवणूक करता येणार.**
- **एनएसईवर नोंदणीनंतर युनिट्सचा व्यवहार सुरू होऊन रिअल-टाइम किंमत व लिक्विडिटीची सुविधा मिळणार.**
- **स्टोरेज, शुद्धता पडताळणी आणि घडणावळ शुल्क यांसारख्या भौतिक चांदीच्या अडचणी टाळता येणार.**
- **एंजल वन सिल्व्हर ईटीएफ एफओएफ योजनेत किमान ५०० रुपयांपासून गुंतवणूक शक्य.**
- **डिमॅट खाते नसतानाही गुंतवणूक करण्याची सुविधा.**
- **एसआयपी अंतर्गत दैनंदिन गुंतवणुकीसाठी किमान २५० रुपये, साप्ताहिक/पाक्षिक/मासिक गुंतवणुकीसाठी ५०० रुपये आणि त्रैमासिक एसआयपीसाठी १,५०० रुपयांची किमान मर्यादा.**

## कोटक लाइफ लॉन्चेस ‘कोटक सिग्नेचर लेगेसी’ टर्म प्लॅन

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

कोटक महिंद्रा लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (“कोटक लाइफ”) तर्फे कोटक सिग्नेचर लेगेसी या वयाच्या 99 वर्षांपर्यंत वाढता विमा संरक्षण प्रदान करणारा लाइफ टर्म प्लॅन सादर करण्यात आला आहे. यामुळे लोकांना त्यांच्या कुटुंबाची दीर्घकालीन आर्थिक सुरक्षा मजबूत करण्यास मदत होईल. 40 वर्षे आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या लोकांच्या बाबतीत प्रगतीसोबत त्यांची सुरक्षा पुरेशी वाढलेली नाही या वास्तवाला कोटक सिग्नेचर लेगेसी हा प्रतिसाद देते. करिअर पुढे जात असताना आणि जबाबदाऱ्या वाढत असताना, गृहकर्ज, EMIs, दीर्घकालीन कौटुंबिक उद्दिष्टे आणि अपेक्षा यांसारख्या आर्थिक वचनबद्धता सातत्याने वाढत राहतात. तरीही या टप्प्यावर अनेकांना असे वाटते की त्यांचे विमा संरक्षण पुरेसे नाही, कारण विद्यमान विमा संरक्षण अपुरे आहे किंवा दीर्घकाळामध्ये त्याचा पुनर्विचार केलेला नाही. कोटक सिग्नेचर लेगेसी प्लॅन ही उणीव भरून काढतो. तो बदलती जीवनशैली आणि वाढणाऱ्या जबाबदाऱ्यांसोबत दीर्घकालीन सुरक्षा प्रदान करतो, आर्थिक सुरक्षिततेला बळकटी देतो. कोटक लाइफचे व्यवस्थापकीय संचालक श्री. महेश बालासुब्रमण्यम म्हणाले, “ ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणारी नाविन्यपूर्ण उत्पादने तयार करून वितरित करणे ही आमची कोटक लाईफमध्ये वचनबध्दता आहे.कोटक सिग्नेचर लेगसी व्यक्तींना त्यांच्या वाढत्या संरक्षण गरजा बळकट करण्यास सक्षम करते आणि त्यांच्या जीवनप्रवासासोबत पुढे जाणारी योजना तयार करते.

## द स्मार्टर ई इंडिया २०२६ बनला गुजरातचा ‘ऊर्जेचा महाकुंभ’

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताची स्वच्छ ऊर्जा यात्रा आता केवळ लक्ष्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती अंमलबजावणीच्या नव्या टप्प्यात प्रवेशली आहे. अशा वेळी तंत्रज्ञान, उत्पादन आणि धोरणांशी संबंधित संवाद एकाच व्यासपीठावर आणणाऱ्या प्लॅटफॉर्मचे महत्त्व वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर गुजरात — उदयोन्मुख ऊर्जा केंद्र म्हणून — पुन्हा एकदा 25 ते 27 फेब्रुवारीदरम्यान गांधीनगर येथे द स्मार्टर ई चे आयोजन करत आहे. हा कार्यक्रम गुजरातमधील सर्वात मोठ्या स्वच्छ ऊर्जा प्रदर्शनाच्या रूपात स्थापित होत असून उद्योगजगत त्याला ‘ऊर्जेचा महाकुंभ’ असे संबोधत आहे. मेस्से मुएनचेन इंडिया चे सीईओ आणि आईएमईए चे अध्यक्ष भूपिंदर सिंह म्हणाले की ऊर्जा क्षेत्रातील चर्चांचे स्वरूप आता बदलले आहे. भारत आता केवळ उद्दिष्टांवर चर्चा करत नाही, तर अंमलबजावणी, पुरवठा साखळी आणि देशांतर्गत उत्पादनातील स्पर्धेवर लक्ष केंद्रित करत आहे. द स्मार्टर ई इंडिया हा बदलच दर्शवतो, त्यामुळे उद्योग त्याला ऊर्जा महाकुंभ मानू लागला आहे.

जागतिक स्तरावरही भारताच्या स्वच्छ ऊर्जा निर्णयांवर लक्ष ठेवले जात आहे. सोलर प्रमोशन इंटरनॅशनल चे व्यवस्थापकीय संचालक फ्लोरियन वेसेंडॉर्फ म्हणाले की मोठ्या प्रमाणावर ऊर्जा परिवर्तन कसे अंमलात आणले जाते याचे जागतिक उदाहरण भारत बनत आहे. येथे होणारे बदल जागतिक पुरवठा साखळी आणि तांत्रिक प्राधान्यांवर प्रभाव टाकतात. द स्मार्टर ई इंडिया मधील वाढती आंतरराष्ट्रीय सहभागिता याच रुचीचे द्योतक आहे.

या आयोजनात 300 हून अधिक प्रदर्शक सहभागी होणार असून ते सौर ऊर्जा, ऊर्जा साठवण, इलेक्ट्रिक मोबिलिटी, पायाभूत सुविधा आणि संपूर्ण ऊर्जा प्रणालींच्या विविध घटकांशी संबंधित असतील. ही व्यापक सहभागिता दर्शवते की भारताचा नवीकरणीय ऊर्जा परिसंस्था आता अशा मंचांभोवती संघटित होत आहे, जिथे तंत्रज्ञान, धोरण आणि व्यावसायिक निर्णय एकत्रितपणे समोर येतात.

कार्यक्रमात 19,000 हून अधिक व्यावसायिक अभ्यागत, 300 हून अधिक विचारवंतांची परिषदेत उपस्थिती आणि 60 हून अधिक आंतरराष्ट्रीय वक्ते सहभागी होणार आहेत. हे तज्ञ विविध मंचांवर — जसे की परिषद: Adoption to Leadership: Powering Atmanirbhar Bharat through Technological Innovation, Voices of India Energy Leader – The Smarter E India Podcast Series आणि Innovator and Start-up Arena — चर्चा करतील.

**कार्यक्रमाच्या व्यापक प्रभावाचा विचार करून अभिनेते प्रतीक गांधी यांची द स्मार्टर ई इंडिया 2026 चे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आयोजकांच्या मते, यामुळे स्वच्छ ऊर्जा आता भारताच्या अर्थव्यवस्था, उत्पादन, पायाभूत सुविधा विकास आणि रोजगारनिर्मितीशी घट्टपणे जोडली गेली असल्याचे स्पष्ट होते.**

## दिव्यांग मुलांच्या चेहऱ्यावर उमटला आकाशाचा आनंद

'व्हॅलेंटाईन डे'निमित्त ओवायई फाउंडेशनचा उपक्रम; ३५ मुलांना हेलिकॉप्टर राईडचा अनुभव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



आकाशात उडणारे हेलिकॉप्टर अनेकांनी पाहिलेले असते; पण त्यात बसण्याचा अनुभव प्रत्येकाला मिळत नाही. व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने ओय फाउंडेशन आणि महालक्ष्मी एव्हिएशन यांनी दिव्यांग मुलांसाठी असा क्षण साकारला, ज्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे तेज खुलले. ओपन युअर आईज (ओवायई) फाउंडेशनच्या संस्थापिका डॉ. सिमरन जेठवानी यांच्या पुढाकाराने व महालक्ष्मी एव्हिएशनचे नितीन गोते, कॅप्टन नितीन वेल्डे यांच्या सहकार्याने ३५ मुलांना सहा मिनिटांची हेलिकॉप्टर सफर घडवून आणण्यात आली.

हेलिकॉप्टर जमिनीवरून अलगद वर झेपावताच मुलांनी आनंदाने हात हलवत खाली पाहिले. काहींनी पहिल्यांदाच शहराला वरून पाहत आश्चर्य व्यक्त केले, तर काहींच्या डोळ्यांत उत्साहाश्रू चमकले. 'आज आम्हीही उडालो अन आमची स्वप्नपूर्ती झाली,' असे एका मुलाने हसत सांगितल्यावर उपस्थितांचे मन भारावले. हेलिकॉप्टर उड्डाण करताच सहभागींच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उत्साह उपस्थितांसाठीही भावूक करणारा ठरला.

डॉ. सिमरन जेठवानी म्हणाल्या, “या मुलांना फक्त एक राईड नव्हे, तर आयुष्यभर जपून ठेवतील अशी आठवण द्यायची होती. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून आमचा उद्देश सफल झाला. हा उपक्रम केवळ एक कार्यक्रम नव्हता, तर संवेदनशीलतेचा संदेश होता. आनंद वाटल्यानेच वाढतो. छोट्या कृतीतून मोठा आनंद देत समाजात समावेशकतेची भावना दृढ करणारा हा दिवस आहे. दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूती नव्हे, तर संधी आणि सन्मान देणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो, समाजाशी संवाद वाढतो आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होतो. समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळाव्यात हा संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला."

दिव्यांगांना हेलिकॉप्टर राईड घडविण्याची विनंती डॉ. जेठवानी यांनी आमच्याकडे केली. त्यानंतर सामाजिक भावनेतून आम्हीही याला प्रतिसाद दिला आणि आज ३५ मुलांना हा अविस्मरणीय आनंद देऊ शकलो, याचे समाधान वाटतेय. समाजात समावेशकतेचा संदेश देणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला असून, भविष्यात आणखी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा संस्थांचा मानस आहे, असे नितीन गोते यांनी सांगितले.

आकाशातून जमिनीवरील नजराणा खूप सुंदर दिसत होता, झाडे, नदी, गाड्या, माणसे छोटी-छोटी दिसत होती, अशी भावना व्यक्त करीत सहभागींनी आयोजकांचे आभार मानले.

## ऊस तुटवड्यामुळे साखर हंगाम लवकर संपतो

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

काही वर्षांपूर्वी राज्याची दररोज ऊस गाळप क्षमता सुमारे साडेपाच लाख मेट्रिक टन होती. आता ती जवळपास दुप्पट झाली आहे. मात्र, क्षमतेत वाढ असूनही हंगाम लवकर संपत असल्याने साखर उद्योगासमोर आर्थिक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे साखर हंगाम दोनशे ते अडीचशे दिवस सुरू राहण्यासाठी राष्ट्रीय सहकारी कारखाना महासंघ प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केले. पाटील म्हणाले, ‘पूर्वी साखर कारखाने जूनपर्यंत कार्यरत राहत; मात्र सध्या ऊस तुटवड्यामुळे केवळ ९० ते १०० दिवसांतच अनेक कारखान्यांना गाळप थांबवावे लागत आहे. वाढलेली गाळप क्षमता आणि घटलेली ऊस उपलब्धता यामधील तफावत दूर करण्यासाठी उत्पादनक्षमता वाढवणे हाच पर्याय उरला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने उसाचे उत्पादन वाढवणे गरजेचे आहे. सध्या राज्यातील सुमारे ७० टक्के कारखान्यांचे गाळप पूर्ण झाले असून, बहुतांश कारखाने १५ मार्चपर्यंत बंद होण्याची शक्यता आहे.’ पुढील काही वर्षांत कारखान्यांचा कार्यकाळ २०० ते २५० दिवसांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेच्या किमतींमध्ये मंदीचे वातावरण असून, देशांतर्गत वापर सुमारे २७५ लाख मेट्रिक टनांपर्यंत मर्यादित आहे. त्यामुळे उद्योगाला इथेनॉल उत्पादनाकडे अधिक वळावे लागणार आहे. इथेनॉलचा कोटा किमान ६० कोटी लिटरने वाढवावा, अशी मागणी केंद्राकडे करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांना रास्त व किफायतशीर दर (एफआरपी) वेळेत मिळावा, यासाठी साखरेची किमान विक्री किंमत ४ हजार १०० रुपये करण्याची गरजही पाटील यांनी व्यक्त केली.

# किसान जागृती यात्रेचे रांजणगाव गणपती येथे भव्य स्वागत

## शेतकरी सभेत विविध मागण्यांचा जोर




**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

कन्याकुमारी ते काश्मीर या मार्गावरील किसान जागृती यात्रा पुणे जिल्ह्यातील रांजणगाव गणपती येथे दाखल झाली असता तिचे भव्य व उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. वरिष्ठ शेतकरी नेते जगजीत सिंह डल्लेवाल यांच्या नेतृत्वाखाली ७ फेब्रुवारी ते १९ मार्च २०२६ दरम्यान ही यात्रा सुरू असून विविध शेतकरी व सामाजिक संघटनांनी यावेळी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला.

रांजणगाव गणपती येथे आयोजित शेतकरी सभेला विविध शेतकरी संघटना, माहिती अधिकार संघटना, भ्रष्टाचार विरोधी संघटना, ग्राहक संघटना, स्वराज्य जनजागृती परिषद, ग्राम स्वराज प्रतिष्ठान, ग्रामपंचायत तसेच वारकरी संप्रदाय आणि सामाजिक संस्थांनी पाठिंबा दिला. उपस्थित शेतकरी बांधवांनी यात्रेचे स्वागत करून सत्कारही केला.

सभेत बोलताना जगजीत सिंह डल्लेवाल यांनी केंद्र सरकारवर विविध विषयांवर दिशाभूल करणारी माहिती दिल्याचा आरोप केला. भारत-अमेरिका करारामुळे भारतीय शेतकरी अधिक कर्जबाजारी होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग न स्वीकारता एकत्र येऊन आपल्या हक्कांसाठी संघर्ष करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी किमान आधारभूत किंमत (MSP) हमी कायदा लागू करणे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, ऊसाचा FRP दर ६०० रुपये प्रति क्विंटल करणे, २०१३ चा जमीन अधिग्रहण कायदा पुन्हा लागू करणे आणि पीक विमा योजनेत सुधारणा करणे आदी मागण्यांवर भर देण्यात आला.

तसेच १९ मार्च रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर होणाऱ्या आंदोलनात महाराष्ट्रातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

या सभेला पंजाब, कर्नाटक, राजस्थान, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातील अनेक शेतकरी नेते उपस्थित होते. पंजाबमधून इंद्रजीत सिंह पन्नीवाल, संदीप सिंह खेरा, हर्षदीप सिंह गिल, सोनी सिंह ओलख; कर्नाटक मधून अभिमन्यू कोहोड, दयानंद पाटील; राजस्थान मधून जगदीश कुमार; मध्य प्रदेश मधून महेश अजनबी यांच्यासह महाराष्ट्रातील लक्ष्मण वडले, अनिल घनवट, शिवाजीनाना नांदखिले, सीमा नरोटे, मधुसूदन पाटील महाराज, सुवर्णा वायदंडे, गंगाधर देशमुख, शरद पवळे, संदीप कुटे, चंद्रकांत वारघडे, विजय शिंदे, सीमा पवार, मंगल सासवडे, आकाश साळुंखे, राजू लांडे, रामदास बत्ते, तुषार कुटे आदींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संयोजक व सामाजिक कार्यकर्ते शिवाजी खेडकर यांनी उपस्थित शेतकरी नेते, पदाधिकारी आणि शेतकरी बांधवांचे आभार मानत स्वागताबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.